**गोपनीय/अतितात्काळ**

क्र.पोमसं/२/१०२०/नि.नि.सू.-२०१९-२०/१७९/२०१९
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,**
**मुंबई- ४०० ००१.**
दिनांक :- २६ / ११ / २०२०

**संदर्भ** :- शासन आदेश, गृहविभाग, क्र. रापोसे-०१२०/प्र.क्र.१४/पोल-१अ, दि.२६/११/२०२० (प्रत संलग्न)

**विषय** :- पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) पदावर पदोन्नतीने पदस्थापना..

* * * * *

पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त(नि:शस्त्र) पदावर पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सन २०१६-२०१७ व सन २०१९-२०२० च्या निवडसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या खालील नमूद नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांना पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त(नि:शस्त्र) पदावर पदोन्नतीने त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी पदस्थापनेबाबतचे संदर्भाधिन शासन आदेश याद्वारे कळविण्यात येत आहेत:-

**सन २०१६-२०१७ ची निवडसूची**

| क्र. | अधिकाऱ्याचे नांव | सध्या नियुक्तीचे ठिकाण | पदोन्नतीवरील पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | श्री.ज्ञानेश्वर माधवराव खोल्लम | पोलीस निरीक्षक,मुंबई शहर | सहायक पोलीस आयुक्त, मुंबई शहर |

**सन २०१९-२०२० ची निवडसूची**

| क्र. | अधिकाऱ्याचे नांव | सध्या नियुक्तीचे ठिकाण | पदोन्नतीवरील पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | श्री.हाश्मी नईमपाशा अब्दुल हकीम | पोलीस निरीक्षक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद | पोलीस उप अधीक्षक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक |
| २. | श्री.रामकृष्ण जयवंत कोल्हे | पोलीस निरीक्षक तथापि, एक टप्पा पदोन्नतीने पोलीस उपअधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे | पोलीस उप अधीक्षक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक |
| ३. | श्री.विनायक पांडुरंग लोकरे | पोलीस निरीक्षक, जळगाव | पोलीस उप अधीक्षक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक |

२. घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की,

**अ.** उपरोक्त शासन आदेशांच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात यावी, व तसा अनुपालन अहवाल सत्वर या कार्यालयास पाठवावा.

**आ.** पदोन्नती प्राप्त पोलीस निरीक्षकांच्या नावांसमोरील नमूद सध्याच्या नियुक्ती ठिकाणी काही बदल झालेला असेल तरी सदर अधिकारी सध्या ज्या ठिकाणी कार्यरत असेल त्या घटकप्रमुखांनी अशा पोलीस निरीक्षकास त्यांच्या नावासमोरील नमूद पदोन्नतीवरील पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्यासाठी **कोणत्याही प्रतिक्षेविना तात्काळ कार्यमुक्त करावे.**

**इ.** पदोन्नती आदेशाधिन अधिकाऱ्यास नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करून, कार्यमुक्त केल्याची, तसेच ते नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाल्याची तारीख संबंधीत घटक प्रमुखांनी तात्काळ या कार्यालयास कळवावी. तसेच, प्रस्तुत अधिका-यांविरूध्द गुन्हा दाखल झाला असेल

किंवा खात्यांतर्गत शिक्षेचे आदेश निर्गमित झाले असतील, किंवा कोणाही अधिका-यास निलंबित केले असल्यास तसेच, सदर अधिकारी वेतनवाढ रोखण्याची शिक्षा भोगत असल्यास, संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता त्यांच्याविरूध्दच्या प्रकरणाची सविस्तर माहिती या कार्यालयास तात्काळ कळवावी, व पुढील आदेशांची वाट पहावी. पदोन्नतीवरील अधिकारी जर नेमणुकीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत, तर तसे या कार्यालयास कळवावे, आणि त्यांच्याविरूद्ध या कार्यालयाच्या क्र. २/५५०७, दिनांक १६.०९.१९८३, ११.०९.१९८४ व १०.०२.१९९१ तसेच क्र. पोमसं /३/५५०७/६/९७, दिनांक १३.०२.१९९७ च्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

ई. उपरोक्त अधिकाऱ्यांना विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकिनंतर जर त्यांच्याविरूध्दच्या प्रलंबित / प्रस्तावित विभागीय / संक्षिप्त / प्राथमिक चौकशी / न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने शिक्षा झाल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार, पदोन्नती संदर्भात पुढील कार्यवाही करावी व तसे या कार्यालयास तात्काळ कळवावे.

उ. उपरोक्त पदोन्नती, मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ वर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या, तसेच, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहुन करण्यात येत आहे.

ऊ. उपरोक्त आदेशांतील अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तकांच्या प्रथम पृष्ठांच्या प्रती व पदभार हस्तांतरण प्रमाणपत्राच्या प्रती कृपया सत्वर या कार्यालयास पाठवाव्यात.

ए. ज्या ठिकाणाबाबत कोणत्याही न्यायालयाचे काही विशिष्ट आदेश असतील परंतु त्याठिकाणी सदर आदेशान्वये पदस्थापना झाली असेल तर अशा न्यायालयीन आदेशाची अवमान्यता होणार नाही याचीही दक्षता घेण्यात यावी.

२६/५

**(कुलवंत कु. सारंगल )**
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
पोलीस आयुक्त, पुणे शहर
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा., पुणे
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
सह आयुक्त, तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद (प्रत सस्नेह)
पोलीस अधीक्षक, जळगाव

प्रत :-

आयुक्त, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे (प्रत सस्नेह)
विशेष पोलीस महानिरीक्षक,नाशिक परिक्षेत्र, नाशिक.

प्रत सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, दुसरा मजला मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-३२
**(लक्षवेध :- श्री.कैलास गायकवाड, उप सचिव, गृह विभाग)**
महालेखाकार-१ (लेखा व अनुज्ञेयता) / महालेखाकार-२ (लेखा . परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई /नागपूर.

प्रत :-

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (सस्नेह)
संबधीत जिल्हा कोषागार अधिकारी
पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई.
पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष
कार्यासन अधिकारी, का. क्र. २-अ, ३, ९, ११, १४अ, ३२, ३६, ४०.

निवडसूची सन २०१६-१७ व सन २०१९-२० राज्य पोलीस सेवेतील पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या संवर्गातील पदावर पदोन्नतीने पदस्थापना करण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

**शासन आदेश क्र.रापोसे-०१२०/प्र.क्र.१४ /पोल-१(अ)**

**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**दिनांक :- २६ नोव्हेंबर, २०२०.**

**<u>शासन आदेश</u> :-**

पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या पदावर पदोन्नती देण्याकरिता करण्यात आलेल्या सन २०१६-१७ व सन २०१९-२० च्या निवडसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या नि:शस्त्र पोलीस निरीक्षक या संवर्गातील अधिकाऱ्यांना पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या पदावर पदोन्नतीने त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या ठिकाणी खालीलप्रमाणे पदस्थापना देण्यात येत आहे:-

**सन २०१६-१७ ची निवडसूची**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | सध्या नियुक्तीचे ठिकाण | पदोन्नतीने पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | श्री. ज्ञानेश्वर माधवराव खोल्लम | पोलीस निरीक्षक, मुंबई शहर | सहायक पोलीस आयुक्त, मुंबई शहर |

**सन २०१९-२० ची निवडसूची**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | सध्या नियुक्तीचे ठिकाण | पदोन्नतीने पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | श्री. हाश्मी नईमपाशा अब्दुल हकीम | पोलीस निरीक्षक, अनुसुचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद | पोलीस उप अधीक्षक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक |
| २. | श्री. रामकृष्ण जयवंत कोल्हे | पोलीस निरीक्षक तथापि, एक टप्पा पदोन्नतीने पोलीस उप अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे | पोलीस उप अधीक्षक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक |
| ३. | श्री. विनायक पांडूरंग लोकरे | पोलीस निरीक्षक, जळगाव | पोलीस उप अधीक्षक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक |

०२. उपरोक्त पदोन्नती, मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ वर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या, तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

३. वर नमूद अधिकाऱ्याच्या बाबतीत, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अथवा अन्य मा. न्यायालयाचे आदेश, तसेच निवडणूक आचारसंहिता असल्यास, कायदा व सुव्यवस्था विचारात घेऊन पोलीस महासंचालक यांनी पुढील कार्यवाही करावी.

४. पोलीस महासंचालक, मुंबई यांच्या आदेशानंतर संबंधित अधिकाऱ्यांस बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी नियंत्रक अधिकारी यांनी कार्यमुक्त करण्याबाबतची आवश्यक कार्यवाही करावी व संबंधित अधिकारी यांनी बदलीच्या ठिकाणी रुजू होऊन तसा अहवाल शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(कैलास गायकवाड)**
**उप सचिव, गृह विभाग**

**प्रति,**

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत :-**

- महालेखापाल-१/२(लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
- मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
- मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
- मा. मंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
- मा. राज्यमंत्री (गृह) (शहरे/ग्रामिण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
- अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
- अपर मुख्य सचिव (अपील व सुरक्षा) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
- प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
- अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे,
- संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक,
- अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
- निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई,
- जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक,
- संबंधित अधिकारी (पोलीस महासंचालक, मुंबई यांचेमार्फत),
- निवडनस्ती / पोल-१(अ).